# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/3117 /२०१५ दि. २९/१०/२०१५

महत्वाचे/अति–तात्काळ

## सुचनापत्र

प्रति,

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व संबंधीत महाविद्यालये/प्राचार्य तथा विद्यार्थी

विषय :– सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती–२०१५–१६ च्या नविन मंजुरीसाठी सुधारीत यादी प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ :– १)क्र. उशिस/१४अई/सी.एम.एम./परिपत्रक/२०१५–१६/१०२२३, दिनांक १३/१०/२०१५ नुसार
२)क्र.उशिनाग/सह/अल्पसंख्याक शिष्य/५५६२/२०१५, दि १४/१०/२०१५

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालय/प्राचार्य/विद्यार्थी यांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे– ४११००१ तसेच सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर याचे वरील संदर्भाकिंत विषयाचे पत्र यासोबत संलग्नीत करण्यात येत असून सदर पत्राचे संबंधीत महाविद्यालयाने अवलोकन करून सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती २०१५–१६ करीता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी संदर्भीय पत्रातील दर्शविलेला तक्तातील माहीती व इतर आवश्यक माहीती आपल्या महाविद्यालयाच्या सुचना फलकावर लावून विद्यार्थ्यांना त्वरीत कळवावे तसेच सदर ची कार्यवाही आपल्या महाविद्यालयीन स्तरावर तात्काळ घेऊन शासनाच्या संबंधीत विभागात मेलद्वारे तसेच पत्राद्वारे कळविणे अत्यंत आवश्यक आहे.

सर्व संलग्नीत महाविद्यालयानी याची नोंद घ्यावी.

परिक्षा नियंत्रक,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र:– १) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे संलग्नीत पत्र
२) सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांचे संलग्नीत पत्र

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. उशिसं/१४अई/सीएसएस/परिपत्र/१५-१६/ 10223 दि.१३/१०/२०१५

**महत्वाचे / अति-तात्काळ-**

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : **सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती २०१५-१६ च्या नवीन मंजूरीसाठी सुधारीत यादी प्रसिध्द झाले बाबत . . .**

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना नवीन मंजूरीसाठी scholarships.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत महाराष्ट राज्यातुन सदर पोर्टलवर अत्यंत अल्प प्रमाणात अर्ज प्राप्त झालेले आहेत यास्तव **केंद्रशासनाने सदर योजनेसाठी मेरीट कमी केलेले आहे व पात्र विद्यार्थ्यांची सुधारीत यादी www.scholarships.gov.in व www.dhepune.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे.** तरी आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पोर्टलवर भरण्याबाबत सुचना देण्यात याव्यात. तसेच जाहिरात व यासोबतचे प्रारुप प्रत्येक महाविद्यालयाने त्यांच्या सुचनाफलकावर चिटकवण्यास सांगण्यात यावे.

फेब्रुवारी /मार्च २०१५ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये (बारावी) उत्तीर्ण झालेल्या खाली नमूद केलेल्या टक्केवारीचे विद्यार्थीच या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.

| विद्याशाखा | टक्केवारीचा कट ऑफ स्कोअर | |
|---|---|---|
| | विद्यार्थी | विद्यार्थीनी |
| विज्ञान | ६६.९२ व त्यापुढील | ६९.२३ व त्यापुढील |
| कला | ६४.४६ व त्यापुढील | ६९.०८ व त्यापुढील |
| वाणिज्य | ६८.४६ व त्यापुढील | ७४.३१ व त्यापुढील |
| एम सी व्ही सी | ६४.७७ व त्यापुढील | ७०.४६ व त्यापुढील |

त्याचप्रमाणे आपल्या अधिपत्याखालील जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयास दूरध्वनी द्वारे विषयांकित शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करण्यात कळविण्यात यावे. तसेच नवीन मंजूरी तसेच नुतनीकरणासाठी अर्ज करण्याबाबतचे परिपत्रक अति-तात्काळ महाविद्यालयास पाठविण्यात यावे व परिपत्रकाची एक प्रत संचालनालयास सादर करण्यात यावी.

सोबत - सुचनाफलकाचे प्रारुप

(डॉ. धनराज माने)
नोडल अधिकारी तथा संचालक(उ.शि.),
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर. जुने मॉरीस कॉलेज ईमारत, सिताबर्डी, नागपूर**
**(दुरध्वनी क्रमांक २५५४२१०/फॅक्स क्रमांक ०७१२-२५६१७१३)**
**Email : jdhengp@rediffmail.com**

**अतितात्काळ**
कालमर्यादीत

क्रं.उशिनाग/सह/अल्पसंख्याक शिष्य/५५६२/२०१५
दिनांक १४ /१०/२०१५

**प्रती,** १. कुलसचिव,रातुम, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव,रातुम, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. सहसंचालक तंत्रशिक्षण, सदर,नागपूर
५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सिव्हील लाईन,नागपूर
६. विभागीय उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
७. सर्व प्राचार्य/संचालक शास/अशासकीय महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर
८. शिक्षणाधिकारी माध्यमिक नागपूर/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/भंडारा/गोदिंया

**विषय** :- अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेची अमलबजावणी करणेसाठी विद्याथ्यानी ऑनलाईन केलेले अर्जाला मान्यता देवून या कार्यालयास तात्काळ फारवर्ड करण्याबाबत.
संदर्भ :- उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०१५-१६/१०१६४ दिनांक १२/१०/२०१५

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यांत येते १५/१०/२०१५ अशी असून या कालावधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन केलेले अर्ज आपल्यास्तरावरुन तपासुन म्हणजेच विद्यार्थ्याची मागील वर्षाची गुणपत्रीका, ॲड्रेसफ्रुप बाबतची कागदपत्रे बॅकेच्या पासबुकची पहील्या पानाची या सगळयाची स्कॅन कॉपी अर्जासोबत असलेल्या आपल्या स्तरावरुन संबंधितांना तात्काळ आदेश द्याल व अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रिक ऑनलाईन योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता सहकार्य कराल. आपल्याकडे वेळोवेळी प्राप्त होणा-या ऑनलाईन अर्जाची तपासणी आपल्या लॉगीग आयडी वरुन फारवर्ड करुन या कार्यालयास वेळोवळी अर्ज फारवर्ड करावे अर्ज फारवड न केल्यास, यामुळे विद्यार्थ्याच्या तक्रारी व इतर अडचणी उद्भवल्यास तसेच विद्यार्थी वंचीत राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

A.M. Rahatgaonkar
सहसंचालक उच्चशिक्षण
नागपूर विभाग, नागपूर

प्रत - मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा.पुणे -१

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११२५३

क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०१५-१६/ 10165. दिनांक : 12 OCT 2015
अत्यंत महत्वाचे / स्पीड पोस्ट/तात्काळ

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय : अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१५-१६ ची आवेदनपत्रे विहीत मुदतीत ऑनलाईन फॉरवर्ड करणेबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य मिळावे यासाठी विषयांकीत शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे.सदर शिष्यवृत्ती योजनेचे आपल्या खात्यावर ऑनलाईन जमा झालेले अर्ज तात्काळ ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावेत. त्याचप्रमाणे आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना देखिल त्यांच्या खात्यावर ऑनलाईन जमा झालेले अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

सदर अर्ज केंद्रशासनाने ठरवून दिलेल्या विहीत मुदतीत केंद्रशासनाकडे फॉरवर्ड करणे आवश्यक आहे. सदर योजनेसाठी कोणतीही मुदतवाढ पुढील कार्यवाहीसाठी देण्यात येणार नाही. आपण अर्ज फॉरवर्ड केल्याशिवाय या संचालनालयास विहीत मुदतीत अर्ज केंद्रशासनाकडे फॉरवर्ड करणे शक्य होत नाही. सदर योजनेचे अर्ज विहीत मुदतीत केंद्रशासनास फॉरवर्ड न झाल्यास व पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्व जबाबदारी आपली राहील.

तरी आपण वरील विषयाची गंभीर दखल घेऊन योजनेचे अर्ज अति तात्काळ ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. त्याचप्रमाणे कोणताही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १.